# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 414/2023 दिनांक : 31.10.2023

## 1)खुन :–

**वजिराबाद :–** दिनांक 30.10.2023 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घराचे बाजुस उस्मानशाही स्कुलच्या ग्राउंडवर पक्कीचाळ नांदेड येथे,** यातील **मयत नामे राजु यलप्या मंदा, वय 40 वर्षे, रा. पक्कीचाळ नांदेड** हा त्याचा फिर्यादी भाऊ यांचे सोबत बसलेला असताना यातील नमुद दोन आरोपी हे मोटार सायकलवर आले व त्यांनी मयत राजु यास दारू पिण्यासाठी पैशाची मागणी केली. त्याने पैसे देण्यास नकार दिला असता नमुद आरोपीतांनी संगणमत करून त्यास लाथा बुक्याने मारहाण करून आरोपी लखन माने याने त्यास खाली जमीनीवर पाडले व आरोपी रितेश माने याने त्यास दगड उचलुन डोक्यात मारून गंभीर जखमी करून खुन केला. वगैरे **फिर्यादी नरसींग यलप्या मंदा, वय 25 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. पक्कीचाळ नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 475/2023 कलम 302, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मुत्यपोड, मो.नं. 9146579102** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 24.10.2023 रोजी, **नवीन मोंढा टेलीफोन ऑफिस ते मोंढा दोन नंबर कमान तसेच नवीन मोंढा टेलीफोन ऑफिस ते पोकर्णा बिल्डींग नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांची नवीनमोंढा टेलीफोन ऑफीस ते मोंढा दोन नंबर कमान तसेच नवीन मोंढा टेलीफोन ऑफिस ते पोकर्णा बिल्डींग येथुन बीएसएनल चे केबल किंमती 45,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गंगाधर मुकूंदराव इंगोले, वय 50 वर्षे, व्यवसाय नौकरी जेटीओ बीएसएनल स्नेहनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 356/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2547 वाघमारे, मो. क्रं. 8669005593** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर :–** दिनांक 29.10.2023 रोजी चे 23.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी मदिनानगर अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे नातेवाईक हे कामठा येथे घराला कुलूप लावुन नातेवाईकाकडे कार्यक्रमास गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे बॅग मध्ये ठेवलेले नगदी 25,000/–रू चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सय्यद मोहसीन सय्यद यासीन, वय 48 वर्षे, रा. मदीनानगर अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 410/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1839 कांबळे, मो. क्रं. 9823342366** हे करीत आहेत.

**3)मुखेड :–** दिनांक 29.10.2023 रोजी चे 19.00 ते दि.30.10.2023 चे 06.00 वा. चे दरम्यान, **नगरपरिषद मुखेडचे आवारात ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने नगरपरिषद मुखेडचे आवारात लावलेली घंटागाडी क्रमांक एमएच–26/बीई–4357 हया गाडीची बॅटरी एक्साईड कंपणीची किंमती 5500/–रू ची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी शेख अमीर पि शेख अहमद, वय 56 वर्षे, व्यवसाय नौकरी नगरपालीका स्वच्छता मुकदम रा. अहिल्याबाई होळकरनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 324/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अंसापुरे, मो. क्रं. 9930052062** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 27.10.2023 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी प्रेमनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचा मुलगा मो सा धुत असतांना यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी जवळ येवुन तु ईथे गाडी धुवू नको सगळे पाणी माझे अंगणात येत आहे असे म्हणुन अश्लील शिवीगाळ केल्याने फिर्यादीने घाबरून तीचे पतीला व तीचे भाऊ व आई यांना बोलावुन घेतले असता नमुद आरोपीतांनी विटकरीने मारहाण केली तसेच फिर्यादीचा भाऊ कैलास होळकर यास आरोपीतांनी लोखंडी रॉडने उजव्या हातावर वार करून गंभीर जखमी करून फॅक्चर केले. तसेच फिर्यादीचे पतीस व लहान भावास पण मारहाण केले. वगैरे **फिर्यादी संगीता गोविंद हासेवाड, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. बारगडावाडी ता. नायगांव जि. ह. मु. भावासार चौक नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे** भाग्यनगर गुरनं **400/2023 कलम** 326,324,323,294, 504, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री परगेवार, मो. नं. 9028846691** हे करीत आहेत.

**1)उमरी :–** दिनांक 25.10.2023 रोजी चे 21.00 वा. चे सुमारास, **रंजीत लक्ष्मण जोगदंड यांच्या घराचे समोर सावरगाव कला ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन नवीन देवी स्थापन व ग्रामपंचायत निवडणुकीचा राग मनात धरून शिवीगाळ करून धक्काबुक्की करू लागले तेव्हा त्यांना तुम्ही येथुन निघुन जा असे म्हणताच आरोपी धोंडीबा पिराजी आहीरे याने फिर्यादीच्या डाव्या हातावर लोखंडी रॉडने मारून हात फॅक्चर केले व साक्षीदाराला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली व फिर्यादीच्या हातातील एक तोळा वजनाची अंगठी घटनास्थळी पडली असुन ती कोणीतरी काढुन घेतली. वगैरे **फिर्यादी पंढरी रघुनाथ जोगदंड, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. सावरगांव कला ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं **302/2023 कलम** 326, 327, 323, 504, 143, 147, 148, 149 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री चेवले, मो. नं. 8600303355** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ

**1)लिंबगाव :–** दिनांक 27.09.2020 ते दि 07.09.2023 चे दरम्यान, **मौ. आळंदी ता. खेड जि. पुणे येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादी बाई सोबत आळंदी येथे जाऊन आंतरजातीय विवाह केला व फिर्यादीस भाडयाचे रूम घेवुन राहु लागला. फिर्यादीने सोबत आणलेले दहा तोळे सोन्याचे दागिने विकून रूम भाडे व किराणा सामान व इतर गोष्ठीसाठी खर्च केला. आरोपीस दारूचे व्यसन लागल्यामुळे फिर्यादी बाईस तु तुझे माहेरहुन रूम भाडे, किराणा सामान आणण्यासाठी दहा हजार रूपये घेवुन ये असे म्हणुन फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ केला. रात्री बेरात्री घराबाहेर काढत होता. माहेरहुन पैसे आण नाहीतर तुझी किडणी विकतो, तुला गायब करतो असे म्हणुन मारहाण करून धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 152/2023 कलम 498(अ), 323, 504, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2304 टोम्पे, मो.क्रं. 9823288458** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** दिनांक 04.11.2015 ते दि आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी थडी बोरगाव आईचे घरी मोतेवार नगर भक्तापुर रोड देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस वेगवेगळया कारणावरून तसेच माहेरहुन 1,00,000/–रूपये घेवुन ये असे म्हणुन सासरी वारंवार शारिरीक व मानसिक छळ करून माहेरी येवुन शिवीगाळ व मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 463/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2822 करकवळे, मो.क्रं. 9764574333** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**भोकर :–** दिनांक 27.10.2022 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **भोकर ते नांदेड जाणारे रोडवर श्रवण ईलेक्ट्रीकल कंपणीचे समोरील रोडवर वाकद शिवारात भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे निखील संभाजी मामीडवार, वय 18 वर्षे, रा. सोनारी ता. भोकर जि. नांदेड** हा व त्याचा मित्र प्रजोत मुंडे असे पोमनाळा येथील पवन सुर्यवंशी यांचे मोटार सायकल क्रमांक एमएच–26/सीबी–3974 ने नांदेड येथुन भोकरकडे येत असतांना भोकरकडुन नांदेडकडे जाणारा ट्रक क्रमांक जीजे–06/एव्ही–3402 चे चालकाने त्यांचे ताब्यातील ट्रक हा भरधाव वेगात हयगय व निष्काळजीपणे चालवुन समोरून मयताचे मो सा ला जोराची धडक देवुन निखील हा जागीच मरण पावला व प्रज्योत मुंडे हा खाजगी रूग्णालय नांदेड येथे उपचार घेत आहे. वगैरे **फिर्यादी संभाजी पि. पितांबर मामीडवार, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती व हातमाग कामगार रा. सोनारी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 380/2023 कलम 279, 337, 338, 304(अ), भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री तांबोळी, मो.क्र. 9875787785** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)उस्माननगर :–** दिनांक 30.10.2023 रोजी चे 01.15 वा. चे सुमारास, **चिखली जाणारे रोडवर सावळेश्वर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 20,160/–रुपयाची व कार किंमती 1,00,000/–रू ची मध्ये वाहतुक करीत असतांना चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गजानन विठ्ठलराव गाडेकर, ने. पोस्टे उस्माननगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 160/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2336 राठोड, मो.नं. 9545689777** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 415/2023 दिनांक : 31.10.2023

पोलीस अधिक्षक कार्यालयात "**स्व. इंदिरा गांधी** व **सरदार वल्लभभाई पटेल** " यांची जयंती साजरी

31 ऑक्टोबर, 2023 मंगळवार रोजी "**स्व. इंदिरा गांधी** व **सरदार वल्लभभाई पटेल**" या महापुरूषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली. मा. पोलीस अधिक्षक साहेबांनी शपथेचे सामुहीकरित्या वाचान केले. या प्रसंगी **मा. श्री. विजय धोंडगे**, राखीव पोलीस निरीक्षक, **मा. श्री सुनिल निकाळजे**, पोनि नियंत्रण कक्ष, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित राहुन "**स्व. इंदिरा गांधी** व **सरदार वल्लभभाई पटेल** " या थोर पुरूषास अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन, सपोउपनि **श्री सुर्यभान कांगणे, पोहेकॉ/संजय सांगवीकर, पोकॉ/श्री विनोद भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड













# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 416/2023 दिनांक : 31.10.2023**

## नांदेड पोलीस दलातील दोन पोलीस अधिकारी व दोन पोलीस अंमलदार सेवानिवृत्त...

नांदेड पोलीस दलातील दोन पोलीस अधिकारी व दोन पोलीस अंमलदार नियत वयोमानानुसार दिनांक 31.10.2023 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यामध्ये एक पोनि, एक पोउपनि, आणि दोन पोलीस अंमलदार आहेत. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्रीमती डॉ. अश्विनी जगताप**, पोउपअ(मु) नांदेड हस्ते सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सदर सेवानिवृत्त समारंभ मंथन हॉल पोलीस अधिक्षक कार्यालय येथे पार पडला. सर्व सेवानिवृतांनी आता आपल्या कुटूंबाकडे पुरेसा वेळ देण्याचा सल्ला दिला. या प्रसंगी, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, **मपोउपनि श्रीमती माया भोसले**, पोलीस कल्याण विभाग नांदेड, व ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी व मिडीया प्रतिनिधी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **मपोउपनि श्रीमती माया भोसले**, पोलीस कल्याण, यांनी केले असुन, **मपोकॉ राखी कसबे**, पोलीस कल्याण, यांनी कार्यक्रमाचे उत्तम प्रकारे आयोजन केले.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अंमलदाराचे नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | पोनि | श्री द्वारकादास गोविंदराव चिखलीकर | स्थागुशा |
| 02 | पोउपनि | श्री नजीर हमजा हुसेन शेख | नियंत्रण कक्ष |
| 03 | पोहेकॉ/2498 | श्री पंडीत केशवराव कल्याणकर | पोस्टे तामसा |
| 04 | पोना/2355 | श्री केशव माणिकराव मार्लेवाड | पोस्टे किनवट |

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

